जनसंपर्क कक्ष
22 JUL 2025 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ, डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेमध्ये सामंजस्य करार

## दोन्ही संस्थांमध्ये होणार संशोधन, सेवांचे आदानप्रदान

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठ आणि डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेदरम्यान नुकताच शैक्षणिक, आरोग्य क्षेत्रातील संशोधन आणि सेवांचे आदानप्रदान करण्याच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला.

करारावर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि डी.वाय. पाटील शिक्षण संस्थेचे कुलगुरू डॉ. राकेशकुमार शर्मा यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी झाल्या.

कुलगुरू डॉ. शर्मा म्हणाले, 'पूर्वीच्या सामंजस्य कराराचा दोन्ही बाजूंना चांगला लाभ झाला. कराराची व्याप्ती वाढल्यामुळे येथून पुढील काळात वैद्यकीय सेवांच्या पलीकडे इतरही विविध विभागांमध्ये सहकार्यवृद्धी करता येणे शक्य होईल. विद्यार्थ्यांचे आदानप्रदानही सुलभ होईल. परस्पर सहकार्यातून आपण एकत्रित वृद्धिंगत होऊ.'



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेतर्फे झालेल्या सामंजस्य कराराचे हस्तांतरण करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि कुलगुरू डॉ. राकेशकुमार शर्मा. शेजारी डॉ. प्रमोद पाटील, डॉ. विलास शिंदे, डॉ. विश्वनाथ भोसले, डॉ. शिंपा शर्मा यांच्यासह मान्यवर अधिकारी.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठात सूक्ष्मजीवशास्त्र, मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंटपासून ते सामाजिक कार्यापर्यंत असे अनेक अभ्यासक्रम आहेत, जे वैद्यकीय क्षेत्राला पूरक आणि उपयुक्त आहेत. त्यामधील संशोधकांमध्ये विचारांची आणि संशोधनकार्याची देवाणघेवाण तसेच सहकार्य निर्माण व्हायला हवे.'

डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत केले. डॉ. शिंदे यांनी आभार मानले.

सकाळ

# मराठी भाषा टिकवण्यासाठी धोरणात्मक प्रयत्नांची गरज

## डॉ. दीपक पवार : 'मराठी भाषेचे भवितव्य'वर व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २१ : 'मराठी भाषा टिकवण्यासाठी केवळ भावनिक प्रेम नव्हे, तर धोरणात्मक, शैक्षणिक आणि तांत्रिक प्रयत्नांची नितांत गरज आहे,' असे प्रतिपादन मुंबईतील मराठी भाषा अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. दीपक पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, जिल्हा मराठी अध्यापक संघातर्फे 'मराठी भाषेचे भवितव्य' यावर राजर्षी शाहू स्मारक भवनातील मिनी सभागृहात व्याख्यान झाले. यावेळी ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. पवार म्हणाले, 'पोटाची, ज्ञानाची अन् आधुनिकतेची भाषा ती झाली पाहिजे. भाषा ही शाळेत शिकविली जाते की नाही, हा भाषेतील मूळ कळीचा मुद्दा असतो. आपली भाषा शिकून आपल्याला खरेच फायदा होतो का, याचा विचारही यानिमित्ताने झाला पाहिजे. काही झाले तरी मराठी भाषा ही टिकवलीच पाहिजे.'

डॉ. मोरे यांनी विद्यापीठीय अभ्यासक्रमातील मराठीचे स्थान, अभ्यासकांची जबाबदारी आणि संशोधनाच्या नव्या शक्यता यांचा परामर्श घेतला. जिल्हा मराठी अध्यापक संघाचे अध्यक्ष राजेंद्र पाटील, डॉ. शिवकुमार सोनाळकर, प्रा. जयवंत दळवी आदी उपस्थित होते.

'शिविम' शिक्षक संघाचे अध्यक्ष डॉ. भरत जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मांतेश हिरेमठ यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. अशोक शेलार यांनी सूत्रसंचालन केले. विजय सरगर यांनी आभार मानले.

22 JUL 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने गतवर्षीपासून बी. ए. फिल्म मेकिंग व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू केला आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार या अभ्यासक्रमाला तीन वर्षांत सहा सेमिस्टर होणार आहेत. प्रत्येक सेमिस्टरला २२ क्रेडिट मिळणार आहेत. प्रत्येक पेपरला ६० गुणांचा लेखी पेपर आणि ४० गुणांचे प्रात्यक्षिक आहे. प्रत्येक प्रवर्गासाठी शासनाची शिष्यवृत्ती मंजूर झाल्याने विद्यार्थ्यांना अत्यल्प प्रवेश शुल्क भरावे लागत आहे.

### शासनाची शिष्यवृत्ती

बी. ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमाला पहिल्या वर्षापासूनच शासनाच्या सर्व प्रकारची शिष्यवृत्ती मिळत आहे. खुल्या गटातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती आणि पंजाबराव देशमुख वसतिगृहाच्या सुविधा मिळतात. तसेच ओबीसी, एस. टी. आणि एस. सी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती मिळत आहे. सर्व प्रकारची शिष्यवृत्ती मिळत असल्याने विद्यार्थ्यांना नाममात्र शुल्क भरावे लागत आहे



• अहिल्या परकाळे, कोल्हापूर

# बी. ए. फिल्म मेकिंग 132 क्रेडिटचा अभ्यासक्रम

नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी शिवाजी विद्यापीठाने केली आहे. याचाच एक भाग म्हणून बारावीनंतर विद्यापीठ परिसरातील मास कम्युनिकेशन विभागात बी. ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रम सुरू केला आहे. या अभ्यासक्रमाला ४० ची क्षमता आहे. गतवर्षी २९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. तर यंदाची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'मेटाफर' या लघुपटाला नॅशनल अॅवॉर्ड मिळाले आहे. विद्यार्थ्यांना शुटींगसाठी कॅमेरा, ट्रॉली, एडिटींगसाठी दहा संगणक आणि आवश्यक त्या सुविधा पुरवल्या आहेत. तसेच शुटींगसाठी थिएटर उभारण्यात आले आहे. अभिनय, लघुपट चित्रीकरण, लघुपट लेखन, कॅमेरा हँडलिंग, चित्रीकरण एडिटींग, दिग्दर्शन आदी गोष्टी शिकवल्या जातात. प्रत्यक्ष काम करणारे कलाकार, कॅमेरामन, दिग्दर्शक, निर्माते बोलावून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. त्यामुळे आधुनिक पध्दतीने लघुपट तयार करण्याचे तंत्रज्ञान शिकवले जात आहे. आधुनिक तंत्रज्ञानानुसार फिल्म मेकिंग अभ्यासक्रमात शिकवले जात आहे. करमणुकीच्या क्षेत्रात होणाऱ्या बदलानुसार आपण काय केले पाहिजे याचा अभ्यासक्रम अनुभवी तज्ज्ञांकडून शिकवला जात आहे. चित्रपटसृष्टीत प्रत्यक्ष काम करणाऱ्या तज्ज्ञांची अध्यापनासाठी नियुक्ती केली आहे. या अभ्यासक्रमात शिक्षण घेतानाच नोकरीची संधी मिळणार, यात शंका नाही.

### प्रत्येक वर्षाचे प्रवेश शुल्क

| प्रवर्ग | शुल्क |
|---|---|
| खुला प्रवर्ग | ३२ हजार |
| ओबीसी | २२ हजार |
| एस. टी., एस. सी. | २ हजार ५०० |

### अॅप्रेंटिसशिपची संधी

अभ्यासक्रमाशी संबंधित कंपनीमध्ये सहा महिने (अॅप्रेंटिसशिप) प्रत्यक्ष काम करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळते. या कालावधीतील कामानुसार कंपनी मॅनेजरने ३० टक्के गुण द्यायचे आहेत. विद्यार्थी कंपनीत काम करतो की नाही यासंदर्भात कंपनीला भेट देऊन रिपोर्टनुसार शिक्षकाने ३० टक्के गुण विद्यार्थ्यांना द्यायचे आहेत. याचा शोधप्रबंधही विभागाला विद्यार्थ्यांनी सादर करावयाचा आहे. तसेच या कालावधीत विद्यार्थ्यांना सरकार ५० टक्के व कंपनी ५० टक्के मानधन देते.

### नवनिर्मितीक्षम मनुष्यबळ निर्मिती

भारत व जगभरातला मनोरंजन उद्योग वाढत आहे. त्यामुळे या क्षेत्रात विशेष मनुष्यबळाची निकड निर्माण झाली आहे. ओटीटी व डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे तंत्रावर आधारीत नवनिर्मितीक्षम मनुष्यबळ तयार करणे या कोर्सचे उद्दीष्ट आहे.

डॉ. शिवाजी जाधव
(समन्वयक, बी. ए. फिल्म मेकिंग)





लोकमत

# दूरशिक्षणची आज एमबीए प्रवेश प्रक्रिया फेरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एमबीए (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी २०२५-२६ साठी शिवाजी विद्यापीठाकडून १३ जुलैला घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेनुसार विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया फेरी आज, मंगळवारी सकाळी दहा वाजता घेण्यात येणार असल्याची माहिती प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली.

एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन आणि प्रोडक्शन व्यवस्थापन तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयातून एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) पूर्ण करता येणार आहे. या प्रवेश प्रक्रियेतून दूरशिक्षण व ऑनलाईन केंद्र, विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर, सदगुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड आणि कला, वाणिज्य महाविद्यालय पलूस, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड व व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी येथील अभ्यास केंद्रात प्रवेशित होता येणार आहे.

## विनामूल्य प्रशिक्षणासाठी २७ जुलैला परीक्षा

केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२६ साठी पूर्णवेळ, विनामूल्य प्रशिक्षणासाठी २७ जुलैला सामायिक प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे. उच्च शिक्षण विभागांतर्गत राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था मुंबई, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र राज्यातील संस्थामार्फत केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करण्याची मुदत संपली आहे. लवकरच परीक्षेचे वेळापत्रक प्रसिद्ध होईल, अशी माहिती कोल्हापूर प्री-आयएएस ट्रेनिंगच्या संचालिका डॉ. लता जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 JUL 2025
सकाळ

# दूरशिक्षणची आज एमबीए प्रवेश फेरी

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एमबीए (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी १३ रोजी प्रवेश परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेनुसार प्रवेश प्रक्रिया फेरी उद्या, मंगळवारी सकाळी दहा वाजता घेण्यात येणार आहे.

एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन आणि प्रोडक्शन व्यवस्थापन तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयातून एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) पूर्ण करता येणार आहे. या प्रक्रियेतून दूरशिक्षण व ऑनलाईन केंद्र, विवेकानंद महाविद्यालय, सद्‌गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड, कला, वाणिज्य महाविद्यालय पलूस, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड, श्री. व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी येथील अभ्यास केंद्रात प्रवेशित होता येणार आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाची प्रवेश परीक्षा दिली आहे अथवा महा-साईटी/एटीएमए दिली आहे, त्यांना थेट प्रवेश मिळेल. अशा विद्यार्थ्यांनी दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयामध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन प्रभारी संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी केले आहे.

तरुण भारत

# एमबीए ऑनलाईनची आज प्रवेश फेरी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एमबीए अभ्यासक्रम सुरू आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी शिवाजी विद्यापीठाकडून प्रवेश परीक्षा घेण्यात आली होती. ही परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश फेरीला मंगळवार २२ रोजी सकाळी दहा वाजता सुरूवात होणार आहे, माहिती प्रभारी संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठ 'दूरशिक्षण'ची आज एमबीए प्रवेश प्रक्रिया फेरी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एमबीए (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी चालू शैक्षणिक वर्ष २०२५ -२६-साठी प्रवेश प्रक्रिया फेरी मंगळवारी (दि. २२) सकाळी दहा वाजता घेण्यात येणार असल्याची माहिती प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली. एमबीए अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन आणि प्रोडक्शन व्यवस्थापन तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयांतून एमबीए (डिस्टन्स मोड) पूर्ण करता येणार आहे. या प्रवेश प्रक्रियेतून दूरशिक्षण व ऑनलाईन केंद्र, विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर, सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड, कला व वाणिज्य महाविद्यालय पलूस, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड व व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथील अभ्यास केंद्रात प्रवेशित होता येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाची प्रवेश परीक्षा दिलेली आहे अथवा एमएचटी सीईटी, आत्मा परीक्षा दिली आहे. त्यांना थेट प्रवेश मिळेल. अशा विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयामध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

पुढारी

# दूरशिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रम प्रवेशासाठी अर्ज करण्याची ३१ जुलैपर्यंत मुदत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ बी.ए., बी.कॉम, एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए (डिस्टन्स), तसेच एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए. (ऑनलाईन मोड) अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेची दि. ३१ जुलैपर्यंत मुदत आहे. दूरशिक्षण शिक्षण केंद्राच्या सर्व अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे जे अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत, ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे, अशांना दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या ८७ अभ्यासकेंद्रांत प्रवेशाची संधी मिळणार आहे. त्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in संकेतस्थळावर Distance Education लिंकवर प्रवेशाबाबत जाहिरात उपलब्ध असून http:///sukapps.unishivaji.ac.in/studentregistration/#/ या ऑनलाईन लिंकवर प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी केले आहे.

पुढारी

# ८२७ अभ्यासक्रम परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील ८२७ अभ्यासक्रमांचे निकाल आजअखेर घोषित झाले आहेत. सध्या विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी 'बॅचलर ऑफ आर्किटेक्चर' या अभ्यासक्रमांची परीक्षा सुरळीतपणे पार पडली. परीक्षेला १५६ विद्यार्थी उपस्थित होते. दि. २१ रोजी प्री-पीएच.डी. एक्झाम फॅकल्टी एका अभ्यासक्रमाचा निकाल जाहीर झाला. ८२७ अभ्यासक्रमांचे निकाल आजअखेर घोषित झाले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.